# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 12/07/2023 (बुधवार) सकाळ


### विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. देवलापार :– यातील फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. देवलापार येथे अप. क्र. १४४/२१ कलम ३५४(अ) भादवि. सहकलम ८, १२ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील फिर्यादी व **आरोपी नामे– पुरूषोत्तम बाबुलाल कोकोडे, वय ३५ वर्ष, रा. जुनेवाडी देवलापार** हे एकाच गावात आजुबाजुला राहत होते. यातील आरोपीने फिर्यादीच्या अल्पवयीन पिडीत मुलीला आधारकार्ड काढण्याकरीता घेवुन गेला व परत येताना आरोपीने स्वत:च्या शेतात पिडीतेला नेवुन तिला लज्जा येईल असे बोलुन पिडीतेचा विनयभंग केला.

सदर प्रकरणाचे तपास सहायक पोलीस निरीक्षक निशा भुते यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक १२/०७/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश एक्स्ट्रा डी. जे. पांडे सो. नागपूर यांनी वरील नमुद आरोपीस कलम ८ पोक्सो मध्ये ०३ वर्ष सश्रम कारावास व ५०००/–रू. दंड, दंड न भरल्यास ०३ महिने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी परसोडकर सो. यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोलीस हवालदार रणजित जाधव पोस्टे देवलापार यांनी मदत केली आहे.

### चोरी

पो.स्टे. बुट्टीबोरी :– अंतर्गत ०.५ किमी अंतरावर एम. आय. डी. सी. चौक बुट्टीबोरी येथे दिनांक १०/०७/२०२३ चे ०९.३० वा. ते १०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– अनिल विठ्ठलदास मनियार, वय ४८ वर्ष, रा. सुरज नगर हिंगणा हे आपल्या कार क्र. एम. एच.– ४०, बि. जे.– ७३४१ मध्ये आपल्या किराणा दुकानातील कॅश १,५०,०००/– रु. एका बॅग मध्ये भरुन ती बॅग चालकचे बाजुचे सिट वर ठेवली व घरी जाण्यासाठी निघाले असता एक व्यक्ती तिथे आला व फिर्यादीस म्हणाला की तुमचा गाडीचे मागचे टायर पंचर झाले आहे, तेव्हा गाडीमधुन उतरुन पाहिले असता गाडी पंचर होती. पंचर गाडी दुकानातील नौकरांच्या मदतीने दुरुस्त केली व नंतर फिर्यादी हे ड्रायव्हर सीट वर जावून बसले व बाजुला सिटवर ठेवलेली पैशांची बॅग पाहिली असता ती मिळून आली नाही. कोणीतरी अज्ञात व्यक्तीने ती बॅग चोरुन नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बुट्टीबोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक ठाकुर पोलीस स्टेशन बुट्टीबोरी मो. क्र. ८८८८८६२२५७ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर